ePaper


**राऊत हे जळणारं लाकूड...गाढवालाही अक्कल पण... नरेश म्हस्के राऊतांवर संतापले**



| वर्ष - 8 । अंक - 259 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 15 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


## आतील पानांत

- धोनी-दुबेच्या जोडीने केली कमाल!
- निकोलस पुरनने गायलं हिंदी गाणं
- देशात आता टोलनाके राहणार नाहीत
- राज्यसभेत जाण्यासाठी शरण


## सूर्यदेव कोपला, मुंबईत घामाच्या धारा

# राज्याचा 'ताप' वाढला!

## अनेक जिल्ह्यात पारा वाढला, काम असेल तरच बाहेर पडण्याचे प्रशासनाचे आवाहन

। मुंबई / पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज

**राज्याचा ताप वाढला आहे. अनेक जिल्ह्यातील तापमानात मोठी वाढ झाली आहे. विदर्भातील 9 जिल्ह्यांतील तापमान सोमवारी 41 अंश सेल्सिअसच्या मागे-पुढे नोंदवण्यात आले. धुळ्यासह सोलापूर चांगलेच तापले. राज्यात काही ठिकाणी अवकाळी पावसामुळे गारवा जाणवला. तर काही पट्ट्यात कमालीचा उकाडा होता. त्यामुळे नागरिकांची तगमग झाली. मुंबईत अंतर्गत भाग तापले; किनारपट्टी आणि उपनगरांमध्ये तापमानात ४ अंशांपेक्षा अधिक फरक दिसून येत आहे.**



येत्या आठवडाभर राज्यात अवकाळी पाऊस पडण्याचा अंदाज हवामान खात्याकडून वर्तविला जात असतानाच राज्यातील अनेक ठिकाणी तापमान वाढले आहे. राज्यात सोमवारी सोलापुरात सर्वाधिक ४२.२ अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आले.

७ एप्रिल रोजी सोलापुरात ४२ अंश सेल्सिअस तापमान नोंदविण्यात आले होते. त्यानंतर आज सोमवारी त्यात आणखी वाढ झाल्यामुळे सोलापूरकरांच्या अंगाची लाहीलाही होत आहे. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील बहुतेक ठिकाणी तापमानाचा पारा वाढलेला आहे. मुंबईतही तापमान वाढले असून सांताक्रूझ येथे रविवारच्या तुलनेत सोमवारी कमाल तापमान २ अंशांनी वाढून ३६.८ अंश सेल्सिअस नोंदवले गेले.

### विदर्भ- मराठवाड्यात पावसाचा अंदाज

राज्यात अनेक भागांत पावसाला पोषक वातावरण निर्माण झाले आहे. मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांत पुढील चार दिवस ढगाळ वातावरण आणि हलक्या सरींचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. तर दुसरीकडे राज्यात उन्हाचा तापही वाढत आहे.

### पावसाचा अंदाज कुठे?

चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर, अमरावती, वर्धा , यवतमाळ, वाशीम, बुलढाणा, अकोला या भागात गडगडाटासह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तर धाराशिव, लातूर, नांदेड जिल्ह्यांत विजांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसेच सोलापूर, कोल्हापूर, सांगली, पुणे आणि सातारा जिल्ह्यातही पावसाचा अंदाज आहे.

### या जिल्ह्यातील तापमानात वाढ होणार

या आठवड्यात उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ तसेच पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यांत तापमानात वाढ होईल. कमाल तापमान ४० ते ४२ अंश सेल्सिअसपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. दुपारच्या सापेक्ष आर्द्रतेत घट होऊन हवामान उष्ण व कोरडे राहील. पश्चिम व मध्य विदर्भात वाऱ्याचा ताशी वेग २० ते २५ किमीपर्यंत राहील. वाऱ्याची दिशा प्रामुख्याने वायव्येकडून राहील. उष्ण लहरी, उष्णतेच्या लाटा जाणवतील.

### मुंबईकरांना घामाच्या धारा

सोमवारी मुंबईकरांना उष्ण आणि दमट हवामानाचा सामना करावा लागला. शहरातील किनारपट्टी आणि अंतर्गत भागांमध्ये तापमानात ४ अंश सेल्सिअसहून अधिक फरक नोंदवला गेला. भारत हवामान विभागानुसार (IMD) कुलाबा वेधशाळेने ३४.२°C तापमान नोंदवले, तर सांताक्रूझ येथे ३६.८°C तापमान नोंदले गेले. घनदाट वसलेल्या उपनगरांमध्ये तापमान आणखी वाढले — बोरिवलीत ३८.८°C, भांडुप (३८.३°C), पवई (३८°C) आणि मुलुंड (३७.७°C) इतके तापमान नोंदले गेले.

### या जिल्ह्यांत पारा वाढला

| तापमान नोंदी | | आकडेवारी अंश सेल्सिअसमध्ये |
|---|---|---|
| सोलापूर | – | ४२.२ |
| परभणी | – | ४१.६ |
| जळगाव | – | ४१.५ |
| मालेगाव | – | ४०.८ |
| छत्रपती संभाजीनगर | - | ४०.८ |
| सांगली | – | ३९.८ |
| कोल्हापूर | – | ३९.६ |
| नाशिक | – | ३८.१ |

सोलापूरमध्ये सर्वाधिक ४२.२ अंश तापमानाची नोंद

# टेकड्यांवर बांधकामांसाठी 'अभ्यास' डोंगरमाथा-उतार

## 'बीडीपी'त बांधकामासाठी समिती; पर्यावरणप्रेमींचा विरोध

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महापालिकेच्या हद्दीत असलेल्या डोंगरमाथा-डोंगरउतार (हिलटॉप-हिलस्लोप), तसेच जैववैविध्य उद्यान (बीडीपी) आरक्षणामध्ये बांधकाम करण्यासाठी परवानगी देता येईल का, याचा अभ्यास करून नियमावली तयार करण्यासाठी राज्य सरकारने अभ्यासगट स्थापन केला आहे. या निर्णयाला पर्यावरणवाद्यांनी कडाडून विरोध केला असून, समितीमध्ये तज्ज्ञांना स्थान का नाही, असा सवाल केला आहे.**



महापालिकेच्या जुन्या, तसेच नवीन हद्दीच्या विकास आराखड्यात (डीपी) डोंगरमाथा, डोंगरउतार, तसेच बीडीपीचे आरक्षण टाकण्यात आले आहे. या ठिकाणी कोणतेही बांधकाम करण्यासाठी महापालिकेच्या वतीने परवानगी दिली जात नाही. अनेक खासगी जागामालकांच्या जागांचा यामध्ये समावेश आहे. तेथे बीडीपीचे आरक्षण असल्याने बांधकाम करता येत नाही. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेने, तसेच राज्य सरकारनेदेखील यापूर्वीच बीडीपीमध्ये बांधकाम करता येणार नसल्याचे जाहीर केले आहे.

उच्च न्यायालयातदेखील याबाबत राज्य सरकारच्या वतीने प्रतिज्ञापत्र देण्यात आले होते.डोंगरमाथा, डोंगरउतार, तसेच बीडीपीमध्ये असलेल्या जमिनींचे आरक्षण बदलून हा भाग रहिवासी करावा, अशी मागणी जागामालकांकडून केली जात आहे. राज्य सरकारच्या नगरविकास विभागाकडेदेखील याबाबत निवेदने आली आहेत. बांधकाम करण्यासाठी परवानगी देण्याची मागणी वाढत असल्याने या जमिनींबाबत सर्वसमावेशक विकास नियंत्रक नियमावली तयार करण्याचा निर्णय नगरविकास विभागाने घेतला आहे. त्यासाठी निवृत्त माजी सनदी अधिकारी रमानाथ झा यांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यांचा अभ्यासगट स्थापन करण्यात आला आहे. त्यात पुणे महापालिका आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त, नगररचना विभागाचे सहसंचालक, नगररचना विभागाचे उपसंचालक हे सदस्य आहेत. पुणे महापालिकेचे शहर अभियंता समितीचे सदस्य सचिव असतील.या समितीने बीडीपी, तसेच डोंगरमाथा, डोंगरउतार याबाबत राज्य सरकारकडे आलेल्या प्रस्तावांचा अभ्यास करून, तसेच पुणे महापालिका, पीएमआरडीच्या भागात असलेल्या बीडीपी आरक्षणांची माहिती घेऊन त्याचा अभ्यास करावा आणि त्यावर अहवाल तयार करून तो राज्य सरकारकडे पाठवायचा आहे. ही आरक्षणे टाकताना, तसेच 'बीडीपी'ची हद्द निश्चित करताना विचारात घेण्यात आलेले निकष, तसेच इतर बाबींचा अभ्यास करून समितीने त्यावर आपली शिफारस राज्य सरकारला करायची आहे. एका महिन्यात बैठका घेऊन, प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करून आणि इतर गोष्टींचा अभ्यास करून अहवाल देण्याची सूचना नगरविकास विभागाने केली आहे.

दरम्यान, बीडीपीमध्ये बांधकामे करता येणार नाहीत, असा निर्णय राज्य सरकारने घेतला असताना अभ्यास समिती स्थापन करून त्यामधून काय साध्य करायचे आहे, असा प्रश्न पर्यावरणप्रेमींकडून विचारला जात आहे. यापूर्वी सर्व गोष्टींचा अभ्यास केल्यानंतरच 'बीडीपी'मध्ये बांधकामे करण्यास मज्जाव करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे या समितीच्या अभ्यासातून काहीही साध्य होणार नाही, असा पर्यावरणवाद्यांचा दावा आहे.

'बीडीपी'मधील बांधकामाबाबत 'एक्स्प्रेस सिटीझन फोरम'चे प्रकाश कर्दळे यांच्यासह सुहास कुलकर्णी यांनी जनहित याचिका दाखल केली होती. त्यावर राज्य सरकारने उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करून पुणे शहरातील सर्व डोंगरमाथा, डोंगरउतार आहेत तसेच ठेवू, असे सांगितले आहे. त्यामुळे अशी समिती नेमता येणार नाही.

### आपली मते ठामपणे मांडली

बीडीपी, तसेच डोंगरमाथा-उतारावरील बांधकामांबाबत शहरवासीयांनी यापूर्वीच आपली मते ठामपणे मांडली होती. सरकारने स्थापन केलेल्या अभ्यास गटात जैवविविधता, पर्यावरणशास्त्र, शहरातील डोंगरमाथा-उतार, तसेच बीडीपी आरक्षणाबाबतचा अभ्यास करण्यासाठी समिती नेमली आहे. एका महिन्यात समितीने अहवाल द्यायचा आहे.

---

# ओबीसी समाज मुख्यमंत्री फडणवीसांच्या पाठीशी

## दलित, मराठा, ओबीसी समाजासाठी सुविधा दिल्या

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'मुख्यमंत्री म्हणून जबाबदारी सांभाळताना २०१४ ते २०१९ या काळात देवेंद्र फडणवीस यांनी दलित, मराठा, ओबीसी समाजासाठी सुविधा दिल्या. त्यामुळे त्यांच्याविरोधात हा समाज जाऊ शकत नाही,' असा दावा राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री आणि भाजपचे नेते चंद्रकांत पाटील यांनी केला.**



महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित 'फुले' चित्रपटावरून महाराष्ट्रात वाद सुरू झाला असताना शिवसेना (ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर टीका केली आहे.या विषयावर मुख्यमंत्री फडणवीस का गप्प बसले आहेत? त्यांनी मौन सोडावे. नाहीतर हा झगडा 'फुले विरुद्ध फडणवीस' असाच आहे यावर शिक्का बसेल, अशी टीका राऊत यांनी केली आहे. याबाबत मंत्री चंद्रकात पाटील म्हणाले, 'खासदार राऊत यांच्या मनामध्ये असलेला हा जातिवाद आहे. तो कधीही अस्तित्वात येऊ शकणार नाही. मुख्यमंत्री म्हणून जबाबदारी पार पाडताना फडणवीस यांनी नेहमी सर्वच समाजाला न्याय दिला आहे.२०१४ ते २०१९ या काळात आरक्षणाची सुविधा या एकमेकांमध्ये अडकल्या होत्या. फडणवीस यांनी त्या वेगळ्या केल्या. आरक्षण नसतानाही या समाजातील विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा, वसतिगृहे, भत्ता दिला. त्यामुळे फडणवीस यांच्या विरुद्ध दलित, मराठा, ओबीसी समाज जाऊ शकत नाही.'ओबीसींचे मंत्रालय फडणवीस यांनी वेगळे सुरू केले. फडणवीस विरुद्ध फुले-आंबेडकर अशा प्रकारचा जातिवाद खासदार संजय राऊत यांच्याच मनात आहे.' असे पाटील म्हणाले.

या विषयावर मुख्यमंत्री फडणवीस का गप्प बसले आहेत? त्यांनी मौन सोडावे. नाहीतर हा झगडा 'फुले विरुद्ध फडणवीस' असाच आहे यावर शिक्का बसेल, अशी टीका राऊत यांनी केली आहे. याबाबत मंत्री चंद्रकात पाटील म्हणाले, 'खासदार राऊत यांच्या मनामध्ये असलेला हा जातिवाद आहे.

### झगडा 'फुले विरुद्ध फडणवीस'

संबंधित महिलेने काळेपडळ पोलिसांकडे तक्रार दिली होती. याप्रकरणी रिझवान उर्फ टिपू सत्तार पठाण, सद्दाम सलीम पठाण, एजाज युसूफ इनामदार, नदीम बाबर खान यांना अटक करण्यात आली होती. हडपसर भागातील सय्यदनगर भागात दहशत माजविणारा गुंड टिपू पठाण याच्यासह साथीदारांची पोलिसांनी शनिवारी धिंड काढली.

## विविध कामांसाठी खोदाई करण्यास 15 मे 2025 पर्यंतच परवानगी

# रस्ते खोदाईची ‘डेडलाईन’ न पाळल्यास थेट फौजदारी!

## पावसाळ्यात खड्ड्यांची समस्या टाळण्यासाठी महापालिकेचा इशारा

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड शहरात रस्ते खोदाई करणाऱ्यांना मुदतीमध्येच कामे करावी लागणार आहेत. पाणीपुरवठा विभाग, स्थापत्यविषयक कामे, फायबर नेटवर्किंग, महावितरण, महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड (एमएनजीएल) आदी शासकीय आणि निमशासकीय संस्थांना पाइपलाइन टाकण्यासह विविध कामांसाठी रस्तेखोदाई करण्यास १५ मे २०२५ पर्यंतच परवानगी देण्यात आली आहे. त्यानंतर खोदाई केल्यास फौजदारी कारवाईचा इशारा महापालिका प्रशासनाने दिला आहे.आहे.**




शहरात विविध सेवा वाहिन्यांच्या कामांसाठी वारंवार केले जाणारे खोदकाम आणि त्यानंतर केल्या जाणाऱ्या दुय्यम दर्जाच्या रस्ते दुरुस्तीमुळे रस्त्यांची दूरवस्था झाली आहे. त्यामुळे वाहनचालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते.अपघात टाळण्यासाठी शहरातील मुख्य रस्ते आणि अतिवर्दळीच्या रस्त्यांवरील जलवाहिन्या, मलानिस्सारण वाहिन्या, पावसाळी गटारे, इंटरनेट आणि अन्य केबल, एमएनजीएल, तसेच वीजवाहिन्यांची कामे येत्या १५ मेपर्यंत पूर्ण करावीत, अशा सूचना महापालिकेने दिल्या आहेत. केवळ अत्यावश्यक बाब म्हणून काही कामांसाठी परवानगी दिली जाणार असल्याचेही महापालिकेने स्पष्ट केले आहे. मागील पावसाळ्याच्या कालावधीमध्ये ७ हजार ४०५ खड्डे पडले होते. यांपैकी ७ हजार २२७ खड्डे पूर्ण बुजविण्यात आले असून, त्यांचे डांबरीकरणही पूर्ण झाले आहे. मात्र, त्यानंतरही सद्यस्थितीत शहरातील आठही क्षेत्रीय कार्यालय परिसरात १७८ खड्डे बुजविणे शिल्लक आहे. हे खड्डेही त्वरित बुजवून रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे आदेश स्थापत्य विभागाने दिले आहेत. येत्या १५ मे पर्यंत रस्ते खोदाईस

> ’’रस्त्यांची दुरुस्ती आणि डांबरीकरणाची कामे पावसाळ्यापूर्वी करण्यात येणार आहेत. त्याबाबतच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. पावसाळ्यात कोणत्याही कामासाठी रस्ते आणि पदपथ खोदकामास परवानगी दिली जाणार नाही. केवळ अत्यावश्यक आणि अतितातडीच्या कामांना अटी आणि नियम टाकून परवानगी दिली जाणार आहे. विनापरवाना खोदकाम केल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई, तसेच, फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल.”
>
> **–मकरंद निकम,** (शहर अभियंता)

---

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

## आयुक्त शेखर सिंह: बाबासाहेबांच्या विचारांमधून सर्वसमावेशक, न्यायप्रिय प्रशासनासाठी प्रेरणा मिळते

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशासाठी केलेले कार्य महत्त्वपूर्ण आहे, शिक्षण, समता आणि न्याय या मूल्यांच्या आधारे कोट्यवधींचे आयुष्य त्यांनी घडविले असून संविधाननिर्मिती पासून ते सामाजिक चळवळींपर्यंत त्यांच्या प्रत्येक कार्यात परिवर्तन घडवण्याची ताकद दिसून येते, आजही त्यांच्या विचारांमधून सर्वसमावेशक, उत्तरदायी आणि न्यायप्रिय प्रशासनासाठी प्रेरणा मिळते, असे मत आयुक्त शेखर सिंह यांनी व्यक्त केले.**




पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील त्यांच्या प्रतिमेस, भीमसृष्टी तसेच एच.ए क़ॉलनी आणि दापोडी येथील पुतळ्यास आयुक्त शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते.

अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यावेळी म्हणाल्या, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले विचारमूल्य आणि संविधानामुळे देशातील लोकशाही खऱ्या अर्थाने बळकट झाली आहे. त्यांच्या कार्यामुळेच आज प्रत्येक नागरिकाला आपल्या हक्कांची जाणीव असून त्यांनी दिलेली विचारधारा ही आजच्या पिढीसाठी दीपस्तंभासारखी आहे. असे सांगून देशाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी दिलेले व्यापक विचार आणि समता व बंधुभावाची शिकवण सर्वांनी जोपासावी.

मुख्य प्रशासकीय इमारतीत झालेल्या कार्यक्रमास आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, सहशहर अभियंता देवन्ना गट्टूवार, उप आयुक्त राजेश आगळे, अण्णा बोदडे, सचिन पवार, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, विशेष अधिकारी किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता विनय ओव्हाळ, शशिकांत मोरे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, कामगार नेते गणेश भोसले, तुकाराम गायकवाड तर भीमसृष्टी पिंपरी येथे झालेल्या कार्यक्रमास अधिकाऱ्यांसमवेत खासदार श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, शंकर जगताप, अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई सदस्य (सचिव दर्जा) अँड. गोरक्ष लोखंडे, माजी खासदार अमर साबळे, माजी आमदार गौतम चाबुस्कवार, माजी महापौर योगेश बहल, संजोग वाघेरे, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण अध्यक्ष सदाशिव खाडे तसेच शहरातील माजी नगरसदस्य, नगरसदस्या, विविध क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते व महापालिका अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे थोर समाजसुधारक, विधीतज्ञ, अर्थतज्ञ तसेच उत्तम लेखक आणि पत्रकार देखील होते. त्यांनी कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून उच्च शिक्षण घेतले. सामाजिक विषमता, अनिष्ठ रुढी, परंपरा यांच्या विरोधात त्यांनी आयुष्यभर लढा दिला. भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. जगभरातील राजकीय अभ्यासक तसेच थोर इतिहासकार हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहीलेल्या संविधानाचा अभ्यास करतात. त्यांनी घटनेत समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय यांसारखी मूलभूत तत्त्वे समाविष्ट करून भारताची ओळख जगातील एक सक्षम, आधुनिक, लोकशाहीप्रवण देश म्हणून निर्माण झाली आहे. तर ‘शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा’ असा त्यांनी दिलेला संदेश आजच्या पिढीला मार्गदर्शक ठरला आहे. दरम्यान, सकाळी भीमसृष्टी पिंपरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यावर एकता कर्मचारी संघटनेच्या वतीने हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करण्यात आली.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### संत आपल्याला जागे करतात

प्रत्यक्ष विषयापेक्षा विषयी माणसाची संगत फार वाईट असते, हे ज्याप्रमाणे संसारात, तसेच परमार्थातही लागू आहे. संगतीचा परिणाम नेहमी मनावर होतो; म्हणून चांगल्या विचारांच्या माणसाची संगत धरावी. चांगले-वाईट हे नेहमी आपल्यावरूनच ओळखावे. स्वत:ला सुधारण्याऐवजी आपण जगाची सुधारणा करायला जातो हेच आपले चुकते. जगात संत असतील असे पुष्कळांना वाटतच नाही. संताला ओळखायला आपल्या अंगी थोडेतरी भगवंताचे प्रेम असायला पाहिजे. आपल्याला आपल्या ध्येयाचा विसर पडला, परंतु संतांनी आपल्याला जागे केले. चुकीची वाट चालत असताना, ‘अरे, तू वाट चुकलास,’ अशी जागृती संतांनी आपल्याला दिली. तेव्हा, जिकडे पाठ होती तिकडे आपण तोंड केले आणि पुन: चालू लागलो, तर आपण योग्य स्थळी जाऊ. संत आनंदरूप झाल्यावर स्वस्थ बसत नाहीत. ते ज्या लीला करतात त्या जगाच्या कल्याणासाठी असतात. त्या वेळीही ते आपल्या मूळच्या आनंदातच असतात. ते स्वस्थ बसलेले दिसले तरी जगाचे कल्याण करीतच असतात. आपण धडपड करून फुकट मरतो, त्यापेक्षा ते स्वस्थ बसून जिवंत राहतात, हे केव्हाही चांगलेच होय. संत आनंदरूप झालेले असल्यामुळे त्यांच्या वचनानुसार आपण जाऊ या. लोकांना उपदेश करण्यामध्ये संतांचा हेतू एकच असतो, आणि तो हा की, ‘जे मला कळले आहे ते लोकांना कळून लोक सुखी होऊ द्या.’ संत आपल्या स्वार्थासाठी सांगत नसल्याने, त्यांचे म्हणणे आपल्याला खोटे कसे म्हणता येईल ? प्रपंच हा दु:खमय आहे हे कळल्यावर त्यावर काहीतरी उपाय केला पाहिजे. तो संतांनी लिहिलेल्या ग्रंथांच्या वाचनाने कळतो. त्या ग्रंथात सांगितलेले आपण करावे. आपण ग्रंथामध्ये जे वाचतो ते जर आचरणात आणले नाही, तर त्या वाचनाचा उपयोग नाही. वाचनाचे मनन झाले पाहिजे. साधन व वाचन बरोबर चालावे. ज्या संतांचा ग्रंथ आपण वाचतो त्यांच्या कृपेवाचून तो नीट समजणार नाही. ज्याच्यावर त्यांची कृपा आहे त्याला, अंगी विद्वता नसताना देखील, त्या ग्रंथांचा बरोबर अर्थ अगदी स्वाभाविकपणे कळेल. विद्वान् हा कल्पनेने सत्यस्वरूपाचे वर्णन करतो, पण संत मात्र निश्चयाने, खात्रीने आणि अनुभवाने ते रूप काय आहे हे सांगतात. सत्पुरुषांच्या वचनावर विश्वास ठेवून त्याप्रमाणे वृत्ती बनविणे हा खरा सत्समागम आहे.

**बोधवचन:- संतांची आज्ञा पालन करणे म्हणजे संतसेवाच होय.बोधवचन:- कोणत्याही संताचा ग्रंथ वाचताना, तो कृतीत आणण्याकरिता आहे, ही भावना ठेवून वाचावा.**



**‘स्टेट’मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# दक्षिणेत भाजपाची नवी चाल ‘अण्णाद्रमुक’ ची घेतली ढाल!



**उत्तर भारतामध्ये म्हणजे हिंदी पट्ट्यात प्रचंड यश मिळवणाऱ्या भाजपाला दक्षिण भारतात मात्र हातात कटोरा घेऊन दारोदारी भटकावे लागत आहे, ही बाब पक्षाच्या नेतृत्वाला नेहमीच खटकणारी आहे. अटल बिहारी वाजपेयी यांच्या काळापासून नरेंद्र मोदी यांच्या काळापर्यंत त्यात फरक पडलेला नाही, हे महत्त्वाचे!**

### दक्षिणेकडे प्रादेशिक पक्षच..!

दक्षिणेकडे केरळ असो तामिळनाडू असो किंवा अलीकडे आंध्र प्रदेश असो.. त्या ठिकाणी प्राबल्य आहे ते तेथील प्रादेशिक पक्षांचेच! पूर्वी तामिळनाडूत बलशाली असणाऱ्या जयललिता यांच्या अखिल भारतीय अण्णाद्रमुकाची किंवा एम. करुणानिधी यांच्या द्रमुकची सत्ता असायची. जनता सुद्धा त्यांनाच एकमेकांचे पर्याय मानायची.. पूर्वी भाजपा अगदी बाल्यावस्थेत होता, तेव्हा तामिळ नागरिकांनी काँग्रेसला सुद्धा कधी आपलेसे केले नाही. केरळ मध्ये तर कायम डाव्या विचारसरणीच्या पक्षांनी इतरांचा शिरकाव होऊ देणार नाही. आंध्र प्रदेशात तेलुगु देशमने दबदबा कायम ठेवला.

### भाजपाला दक्षिणेत झुकावं लागलं !

या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीला कायमच दक्षिणेतील एखाद्या पक्षापुढे झुकायचे आणि त्यांच्याशी युती करून कसेबसे शक्य असेल तर सत्तेत सहभागी व्हायचे, अशीच आखणी करावी लागली! सध्या आंध्र प्रदेशात एन. चंद्रबाबू नायडू यांचा तेलगू देशम पक्ष हा भाजपा प्रणित एनडीए चा घटक पक्ष आहे.. ते केंद्रातही सत्तेत सहभागी आहेत. केरळ मध्ये भाजपला कोणी साथीदार मिळत नाही, पण आता तामिळनाडूमध्ये मात्र अखिल भारतीय अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम यांच्याशी हात मिळवणी करून भाजपाने हातपाय पसरण्यास सुरुवात केली आहे. अण्णा धुराई यांचा हा पक्ष, नंतर प्रसिद्ध अभिनेते एम. जी. रामचंद्रन यांनी लोकप्रिय केला आणि त्यांच्या निधनानंतर अभिनेत्री जयललिता यांनी त्यावर घट्ट पकड घेतली !

### पूर्वीच्या मित्र पक्षाला घट्ट मिठी..

भाजपाने तामिळनाडूमध्ये पुन्हा एकदा अण्णा द्रमुक बरोबर युती केली आहे. तो पक्ष आता भाजपा प्रणित एनडीए मध्ये सामील झाला आहे. भाजपा एवढ्यावरच न थांबता या पुढील विधानसभा निवडणूक अण्णाद्रमुकचे नेते पलानीसामी यांच्या नेतृत्वा खाली लढणार असल्याचे भाजपाचे नेते, गृहमंत्री अमित शहा यांनी जाहीर केले आहे. आपल्या पूर्वीच्याच मित्राला घट्ट मिठी मारण्याचा डाव भाजपने टाकलेला दिसतो

### भाजपाचे अन्नामलाई ‘साईड ट्रॅक’..

या आधी भाजपाने तामिळनाडूसाठी हुकमी एक्का काढला होता. पण त्या आश्वासक चेहऱ्याला काही दिवस बाजूला ठेवण्याचा निर्णय भाजपाने घेतलेला दिसतो. भाजपाचे ४१ वर्षाचे युवा अध्यक्ष अन्नामलाई यांनी आपल्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात तामिळनाडूमध्ये भाजपचा राज्यातील मतांचा टक्का आणि जनाधार वाढवला होता. त्याबद्दल त्यांचे देशभरात कौतुकही झाले होते. मात्र, आत्ता त्यांनी राज्याच्या अध्यक्षपदाचा कार्यभार सोडला आहे. आता नयनार नागेंथिरन यांनी प्रदेश अध्यक्षपदाचा पदभार सांभाळला आहे. अन्नामलाई यांनी २०२४ पूर्वी अण्णाद्रमुक पक्षावर जाहीरपणे जोरदार टीका केली होती.. त्यांच्या नेतृत्वाचे अक्षरशः वाभाडेही काढले होते आणि आता या बदलत्या राजकीय समीकरणात त्यांच्याबरोबर काम करण्यास नकारही दिला होता, हे राजकारणात लक्षात घ्यायला हवे !

### त्यांच्यामुळे द्रमुकला दूर ठेवले होते..

त्यावेळी त्यांचे ऐकून भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने अण्णाद्रमुक ला एनडीए मध्ये घेण्यास नकार दिला होता. मग, आता भाजपा नेतृत्वाने अन्नामलाई यांना बाजूला करून, त्यांच्यावर काहीसा अन्याय करून अण्णा प्रमुख ला बरोबर घेतले का ? आणि असा निर्णय होणे, हा अन्नामलाई सारख्या युवा नेत्यावर अन्याय म्हणायचा का ? हा प्रश्न विचारला जात आहे. कालांतराने याचेही उत्तर मिळणार आहे. पण, त्यासाठी तामिळनाडूतील विधानसभा निवडणुकीपर्यंत थांबावे लागणार आहे.

### तामिळनाडूतील राजकारण त्यांच्याभोवतीच..

तामिळनाडूचे राजकारण गेली अनेकवर्षे दोन्ही द्रविडीयन पक्षांभोवती केंद्रीत बनलेले आहे. यातील द्रमुक हा पक्ष गेल्या काही वर्षापासून उघडपणे देशविरोधी भूमिका घेत आहे. हिंदू विरोधी, हिंदी विरोधी आणि केंद्राविरोधी अशा भूमिका मुख्यमंत्री स्टॅलिन सातत्याने घेत आहेत आणि केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारला टोकाचा विरोध करत आहे. नरेंद्र मोदी यांनी आखून दिलेले कोणतेही धोरण अमलात आणायचे नाही, अशी टोकाची भूमिका घेणाऱ्यांमध्ये स्टॅलिन हे एक आहेत. देशाचे हित समोर ठेवले, तर स्टॅलिन यांना सत्तेपासून दूर करणे अत्यंत आवश्यक झालेले आहे. त्यामुळे सध्याचे भाजपाचे प्राथमिक महत्वाचे उद्दिष्ट प्रमुख आणि स्टॅलिन यांना हरवणे, हे झाले असून भाजपाचे केंद्रीय नेतृत्व फक्त या दृष्टीने व्यूहरचना आखत आहे आणि तशी पावले टाकत आहे.

### १९८८ मध्ये नेमके काय घडले?

थोडासा इतिहास पाहिला, तर १९८८ मध्ये अण्णाद्रमुक बरोबर युती करून भाजपाने तीन खासदार निवडून आणले होते. हे लक्षात घेतले तर त्यांच्याबरोबरील युती ही भाजपाला नेहमीच फायदेशीर ठरणार आहे असे दिसते आणि स्टॅलिन यांना हटवण्याचा तोच एकमेव मार्ग उरलेला आहे. अशा परिस्थितीत अन्नामलई यांच्या मतांचा आदर करीत भाजपा नेतृत्वाने त्यांना देश पातळीवर काही मोठी जबाबदारी देण्याचे ठरवून हा निर्णय घेतलेला आहे, असे स्पष्ट दिसत आहे. भाजपात गेली दहा वर्षे महत्वाच्या उद्दिष्टाला केंद्रस्थानी ठेवून निर्णय घेतले जातात, व्यक्तीला समोर ठेवून घेतले जात नाहीत, हे पुन्हा सिदध झाले आहे.

### देश उभारणीसाठी आणि विकासासाठी..

देश उभारणीसाठी किंवा विकसित भारतासाठी एखादा निर्णय घेताना कोणा व्यक्तीवर अन्याय झाला असेल, तर त्याची योग्य ठिकाणी वर्णी लावण्याचे तंत्र भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाकडे चांगलेच अवगत आहे. त्यामुळे अन्नामलाई यांचे काय? या निरर्थक प्रश्नाकडे पाहत बसणे, एवढाच उद्योग विरोधकांकडे राहिला आहे, हे नक्की !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# देशात आता टोलनाके राहणार नाहीत

## सरकार नवी टोल पॉलिसी आणणार; नितीन गडकरी म्हणाले



।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**टोलनाक्यांवरील रांगा कमी करण्याकरता सरकार पातळीवर अनेक उपाययोजना आणल्या जात आहेत. त्याकरता फास्ट टॅग पद्धत अनिवार्य करण्यात आली आहे. परंतु, फास्टटॅगकरताही टोलनाक्यावर गाड्यांना उभं राहावं लागतंय. देशातील टोलनाकेच आता बंद व्हावेत याकरता केंद्र सरकारने नवी यंत्रणा राबवण्याचा विचार केला आहे. याबाबत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी माहिती दिली. ते दादरच्या अमर हिंद मंडळाच्या वसंत व्याख्येनमालेत बोलत होते.**

नितीन गडकरी म्हणाले, "टोलबद्दल मी जास्त सांगणार नाही. पण १५ दिवसांच्या आत अशी पॉलिसी येईल की टोलबद्दल तुमची कोणतीही तक्रार असणार नाही. पण मी महाराष्ट्रातील टोलबद्दल बोलत नाहीय. राष्ट्रीय महामार्गांबाबत बोलत आहे."ते पुढे म्हणाले,"सॅटलाईट बेस फ्री टोलिंग सिस्टिम (SATELLITE BASE FREE TOLLING SYSTEM) तयार करतोय. यामुळे टोलनाके राहणार नाहीत. तुम्हाला कोणी अडवणार नाही. कॅमेऱ्याद्वारे तुमच्या नंबरप्लेटवरून टोल निघेल. तुम्ही जिथून निघालात तिथपासून तुम्ही जिथून बाहेर पडाल तिथपर्यंतचाच टोल थेट तुमच्या बँक खात्यातून कापला जाणार."नितीन गडकरी यांनी मुंबई गोवा महामार्गाचा विषय काढताच त्यांना स्वतःलाच हसू उमटले. म्हणाले, "मुंबई-गोवा महामार्गासाठी खूप अडचणी आल्या, पण तुम्ही काळजी करू नका. या वर्षीच्या जूनपर्यंत हा रस्ता १०० टक्के पूर्ण होणार. हा रस्ता बराच रेंगाळला. दिल्ली-जयपूर आणि मुंबई-गोवा आमच्या विभागातील ब्लॅक स्पॉट्स आहेत. त्याच्या अडचणी खूप आहेत. कोकणातील सत्य सांगितलं तर तुम्हाला चालणार नाही. पण १४ ते १५ जण ३ एकर शेतीचे मालक. त्यांच्यात भावा-भावांमध्ये भांडणं. कोर्ट केसेस झाल्या. त्या जमिनीच्या मोबदला देता देता पुरेवाट लागली. पण समस्या सुटली आहे."गेल्या १५ वर्षांहून अधिक काळापासून रखडलेल्या मुंबई गोवा महामार्गाबाबत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी आता नवा मुहूर्त दिलाय. दादरच्या अमर हिंद मंडळाच्या ८७ व्या वसंत व्याख्यानमालेत ते बोलत होते. गेल्या काही वर्षांत देशातील पायाभूत सुविधा आणि दळवळणामध्ये झालेल्या विकासाबाबत ते बोलत होते. नितीन गडकरी यांनी मुंबई गोवा महामार्गाचा विषय काढताच त्यांना स्वतःलाच हसू उमटले. म्हणाले,"मुंबई-गोवा महामार्गासाठी खूप अडचणी आल्या, पण तुम्ही काळजी करू नका. या वर्षीच्या जूनपर्यंत हा रस्ता १०० टक्के पूर्ण होणार. हा रस्ता बराच रेंगाळला. दिल्ली-जयपूर आणि मुंबई-गोवा आमच्या विभागातील ब्लॅक स्पॉट्स आहेत. त्याच्या अडचणी खूप आहेत. कोकणातील सत्य सांगितलं तर तुम्हाला चालणार नाही. पण १४ ते १५ जण ३ एकर शेतीचे मालक. त्यांच्यात भावा-भावांमध्ये भांडणं. कोर्ट केसेस झाल्या. त्या जमिनीच्या मोबदला देता देता पुरेवाट लागली. पण समस्या सुटली आहे."ते पुढे म्हणाले, "येणाऱ्या काळात रस्त्याचे दर वाढले आहेत. नक्कीच या काळात रस्त्याच्या समस्या राहणार नाहीत. आम्ही ३ लाख कोटी रुपयांचे रस्ते नॉर्थ इस्टमध्ये बांधतोय. तुम्हाला मी विनंती करेन, तुम्ही दोन ठिकाणी जरूर जा. श्रीनगरच्या पुढे जा. आता आम्ही अटल टनेल बांधला आहे. आता आठ मिनिटांत जाता येतं. त्या अटल टनेलवरून बाहेर आल्यानंतर लेह-लदाख येथे अत्यंत सुंदर हिमालय आहे. तिथे ९ टनेल बांधतोय."सर्वांत मोठी टनेल बांधतोय तो झोझिला. मायनस ८ डिग्री तापमानात हे टनेल बांधतोय. या टनेलचं ७० टक्के काम झालं असून आतापर्यंत याचं ५ वेळा टेंडर काढलं आहे.

### रत्नागिरी जिल्ह्यातील कामे रखडले

मला सांगताना आनंद होतोय, हे केवळ ५ हजार ५०० कोटी रुपयांत बांधलंय. तिथून बाबा अमरनाथचं दर्शन होऊ शकतं", असं नितीन गडकरी म्हणाले.मुंबई-गोवा महामार्गाच्या पहिल्या टप्प्यातील पळस्पे ते इंदापूर या ८४ किलोमीटर लांबीच्या मार्गाचे काम २०१० साली सुरू झाले होते. १५व्या वर्षातही हे काम पूर्ण होऊ शकलेले नाही. दुसऱ्या टप्प्यातील इंदापूर ते झाराप या कामाला २०१४ मध्ये सुरुवात झाली ते २०१६ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. २०२५ उजाडला तरी हे काम पूर्ण होऊ शकलेले नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बहुतेक कामे पूर्ण झाली असली तरी रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील कामे रखडले आहेत.

# राज्यसभेत जाण्यासाठी शरण!

## रोहित पवारांच्या टीकेवर अशोक चव्हाणांचा पलटवार



।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**भारतीय जनता पार्टीचे राज्यसभेचे खासदार अशोक चव्हाण यांनी भाजपा नेते राम शिंदे यांची विधान परिषदेच्या सभापतीपदी निवड झाल्याबद्दल रविवारी (१३ एप्रिल) नांदेडमध्ये सत्कार केला. यानिमित्त आयोजित सोहळ्यात चव्हाण यांनी भाषण केलं. या भाषणात चव्हाण यांनी राम शिंदेंवर स्तुतीसुमने उधळली. त्याचबरोबर राम शिंदे यांना कर्जत-जामखेड मतदारसंघात सलग दोन वेळा पराभूत करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवारांवर टीका केली.**

त्या टीकेला रोहित पवार यांनी प्रत्युत्तर दिलं आहे.अशोक चव्हाण म्हणाले, "राम शिंदे हे कर्जत जामखेड विधानसभा मतदारसंघातून निवडून आले होते. हा खूप अवघड मतदारसंघ आहे. मध्यंतरी रोहित पवार (स्थानिक आमदार) यांनी मला त्या मतदारसंघात बोलावलं होतं. मी त्या मतदारसंघात गेलो. मात्र, तिथे लोक माझ्याकडे येऊन माझ्या कानात सांगत होते की या ठिकाणी खरा माणूस राम शिंदे आहे. म्हणजेच जनमाणसाचा राम शिंदेंना पाठिंबा आहे."चव्हाण यांच्या या वक्तव्यावर रोहित पवारांनी प्रतिक्रिया दिली आहे. पवार म्हणाले, "अशोक चव्हाणजी, विचारधारेशी निष्ठा नसेल तर राजकीय अनुभवाला काहीच अर्थ राहत नाही, ही पुरोगामी विचारधारा मानणाऱ्या आमच्यासारख्या नव्या पोरांची आपल्यासारख्या ज्येष्ठ व अनुभवी नेत्यांकडे तक्रार आहे. बाकी, आपल्याबद्दल कायमच आदर आहे, होता आणि राहील. परंतु, अनेक ज्येष्ठ नेत्यांच्या भूमिका आणि निष्ठा एवढ्या लवकर बदलतात हे बघून आमच्यासारख्या नव्या पोरांना, कार्यकर्त्यांना दुःख होतं, बाकी काही नाही!

"रोहित पवार एवढ्यावरच थांबले नाहीत. ते म्हणाले, "विधान परिषदेवर अथवा राज्यसभेत जाण्यासाठी मला कोणालाही शरण जावं लागलं नाही हे खरं आहे की नाही, तुम्हीच सांगा असं म्हणत रोहित पवारांनी अशोक चव्हाणांना चिमटा काढला होता. त्यावर आता अशोक चव्हाणांनी पलटवार केला आहे. अशोक चव्हाण म्हणाले, "माझ्या जिल्ह्यात सभापती आले होते. त्यामुळे त्यांचा यथोचित सन्मान करणे, त्यांच्याबद्दल गौरवोद्गार काढण्यात वाईट काय? मी त्यांच्याबद्दल चांगलं बोललो तर त्यात कोणालाही वाईट वाटण्याचं कारण नाही. तसेच राज्यसभेत जाण्यासाठी मी शरण जाण्याचा प्रश्नच येत नाही.

### मी शरण जाण्याचा प्रश्नच येत नाही

विधानसभेतही होतो. त्यांचं जेवढं वय आहे तेवढा माझा राजकीय अनुभव आहे.भारतीय जनता पार्टीचे राज्यसभेचे खासदार अशोक चव्हाण यांनी भाजपा नेते राम शिंदे यांची विधान परिषदेच्या सभापतीपदी निवड झाल्याबद्दल रविवारी (१३ एप्रिल) नांदेडमध्ये सत्कार केला.

# डोनाल्ड ट्रम्प यांच्या हत्येचा कट!

## FBIने 17 वर्षीय विद्यार्थ्याबद्दल दिली धक्कादायक माहिती

। ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हत्येचा कट रचल्याप्रकरणी निकिता कॅसप या तरुणाला अटक करण्यात आली आहे. अमेरिकेतील विस्कॉन्सिनमधील या १७ वर्षीय हायस्कूल विद्यार्थ्याने त्याच्या योजनेसाठी लागणाऱ्या पैशांसाठी त्याच्या पालकांची हत्या केल्याचा आरोप आहे, असे एफबीआयने नुकत्याच उघड केलेल्या न्यायालयीन कागदपत्रांत म्हटले आहे.**

